Vol-13 Special Issue- 1.2 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# भारतीय तत्त्वज्ञानातील वसुधैव कुटुंबकम आणि त्याची सामाजिक-सांस्कृतिक प्रासंगिकता

**वैशाली व्ही. वानखडे (मुळे)**
श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती

## सार

भारतीय तत्त्वज्ञान हे केवळ आध्यात्मिक विचारापुरते मर्यादित नसून सामाजिक, नैतिक आणि सांस्कृतिक आयामांनाही स्पर्श करणारे व्यापक चिंतन आहे. या तत्त्वज्ञानातील "वसुधैव कुटुंबकम्" संकल्पना "संपूर्ण पृथ्वी एकच कुटुंब आहे" मानवी ऐक्य, सहअस्तित्व, सहिष्णुता आणि सर्वांगीण कल्याण यांचा संदेश देते. प्राचीन ग्रंथांसारखे उपनिषद, महाभारत आणि ऋग्वेद या संकल्पनेचा तात्त्विक व ऐतिहासिक पाया सादर करतात. जागतिकीकरण, सामाजिक विषमता, सांस्कृतिक संघर्ष, पर्यावरणीय संकटे आणि आंतरराष्ट्रीय तणाव या आधुनिक समस्यांच्या पार्श्वभूमीवर वसुधैव कुटुंबकम् ही संकल्पना केवळ आदर्श न राहता व्यवहार्य सामाजिक-सांस्कृतिक मूल्य म्हणून उपयुक्त ठरते. ही विविधतेतील ऐक्य, मानवतावाद, सहिष्णुता, शाश्वत विकास आणि जागतिक नागरिकत्व यांना बळकटी देते. शिक्षण, युवा मूल्यसंवर्धन, शासन, परराष्ट्र धोरण आणि जागतिक शांतता उपक्रमांमध्ये तिचा वापर मानवी एकात्मता आणि सहकार्य वृद्धिंगत करतो. या संशोधनात तत्त्वज्ञानात्मक, ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक दृष्टिकोनातून वसुधैव कुटुंबकम् या संकल्पनेचा अर्थ, विकास आणि आधुनिक समाजातील प्रासंगिकता तपासली आहे. निष्कर्षतः, ही संकल्पना आजच्या ध्रुवीकरण व संघर्षप्रधान जगात मानवकेंद्रित मूल्ये आणि जागतिक जबाबदारी यांचा समतोल साधणारी प्रभावी मार्गदर्शक तत्त्वप्रणाली आहे.

## प्रस्तावना :

भारतीय तत्त्वज्ञान हे केवळ आध्यात्मिक चिंतनापुरते मर्यादित न राहता मानवी जीवनाच्या सामाजिक, नैतिक आणि सांस्कृतिक पैलूंनाही स्पर्श करणारे व्यापक चिंतन आहे. या तत्त्वज्ञानातील एक अत्यंत महत्त्वाची आणि सार्वकालिक संकल्पना म्हणजे "वसुधैव कुटुंबकम्" म्हणजेच संपूर्ण पृथ्वी हे एकच कुटुंब आहे. ही संकल्पना ऋग्वेद, उपनिषदे आणि महोपनिषद यांसारख्या प्राचीन ग्रंथांतून उद्भवलेली असून, मानवी ऐक्य, परस्पर सहअस्तित्व, सहिष्णुता आणि सर्वांगीण कल्याण यांचा संदेश देते. व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांच्या मर्यादांपलीकडे जाऊन संपूर्ण मानवजातीला एका कुटुंबाच्या भावनेने जोडण्याचा हा विचार आजच्या जागतिकीकरणाच्या युगात विशेष महत्त्वाचा ठरतो. समकालीन समाजात वाढते सामाजिक विषमत्व, सांस्कृतिक संघर्ष, धार्मिक कट्टरता, पर्यावरणीय संकटे आणि आंतरराष्ट्रीय तणाव यांसारख्या समस्या गंभीर स्वरूप धारण करत आहेत. अशा पार्श्वभूमीवर *वसुधैव कुटुंबकम्* ही संकल्पना केवळ तात्त्विक आदर्श न राहता व्यवहार्य सामाजिक-सांस्कृतिक मूल्य म्हणून पुढे येते. ही संकल्पना विविधतेतील एकता, सांस्कृतिक सहिष्णुता, मानवतावाद, पर्यावरणीय जबाबदारी आणि जागतिक नागरिकत्व यांसारख्या मूल्यांना बळकटी देते. त्यामुळे भारतीय तत्त्वज्ञानातील या विचाराचा अभ्यास करणे आणि त्याची आजच्या सामाजिक-सांस्कृतिक संदर्भात प्रासंगिकता तपासणे अत्यंत आवश्यक ठरते. या संशोधनपत्राचा उद्देश वसुधैव कुटुंबकम् या संकल्पनेची तात्त्विक पार्श्वभूमी, तिचा ऐतिहासिक विकास आणि आधुनिक समाजातील तिचे सामाजिक-सांस्कृतिक परिणाम यांचे विश्लेषण करणे हा आहे. यामधून मानवी ऐक्य, शांतता, सामाजिक समरसता आणि शाश्वत विकास

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

यांसाठी ही संकल्पना कशी मार्गदर्शक ठरू शकते, हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अशा प्रकारे, भारतीय तत्त्वज्ञानातील वसुधैव कुटुंबकम् ही संकल्पना आजच्या जागतिक समस्यांवर एक मूल्याधिष्ठित उपाय म्हणून कशी उपयुक्त ठरू शकते, हे अधोरेखित करणे हेच या अभ्यासाचे प्रमुख ध्येय आहे.

## संशोधनाचे महत्व :

"वसुधैव कुटुंबकम्" ही संकल्पना भारतीय तत्त्वज्ञानातील एक मूलभूत व सार्वकालिक मूल्य दर्शवते. *महाउपनिषद* मध्ये आढळणारी ही उक्ती संपूर्ण विश्वाला एकच कुटुंब मानण्याचा मानवतावादी दृष्टिकोन मांडते. या तत्त्वामध्ये व्यक्ती, समाज, राष्ट्र आणि संपूर्ण मानवजातीमधील परस्परसंबंध, सहअस्तित्व, करुणा, समभाव व सार्वत्रिक बंधुत्व यांचा समावेश होतो. प्राचीन काळात मांडलेली ही संकल्पना आजच्या जागतिकीकरणाच्या, तंत्रज्ञानप्रधान आणि सांस्कृतिक बहुविधतेच्या युगात नव्या अर्थाने अधिक प्रासंगिक ठरते. सध्याच्या काळात जग अनेक गंभीर सामाजिक-सांस्कृतिक आव्हानांना सामोरे जात आहे जसे की युद्ध, दहशतवाद, धार्मिक व जातीय संघर्ष, आर्थिक विषमता, पर्यावरणीय संकटे, स्थलांतर, आणि सामाजिक तणाव. या पार्श्वभूमीवर "वसुधैव कुटुंबकम्" ही संकल्पना केवळ तात्त्विक विचार न राहता एक व्यवहार्य सामाजिक मूल्यप्रणाली ठरू शकते. ती मानवतेच्या एकात्मतेवर भर देऊन 'आपण' आणि 'ते' यातील दरी कमी करण्यास मदत करते. भारतीय सांस्कृतिक परंपरेत सहिष्णुता, विविधतेतील ऐक्य आणि अहिंसा यांसारख्या मूल्यांना नेहमीच महत्त्व दिले गेले आहे. "वसुधैव कुटुंबकम्" ही संकल्पना या सर्व मूल्यांचे संकलित रूप मानता येईल. मात्र आधुनिक समाजात भौतिकवाद, उपभोक्तावाद आणि स्पर्धात्मक वृत्ती वाढल्यामुळे मानवी नातेसंबंध, सामाजिक जबाबदारी व नैतिकतेवर ताण येताना दिसतो. अशा परिस्थितीत या तत्त्वज्ञानाचा पुनर्विचार करणे अत्यंत आवश्यक ठरते. या अभ्यासाची गरज पुढील मुद्द्यांमुळे अधिक अधोरेखित होते : जागतिक पातळीवरील संघर्ष व असहिष्णुता वाढत असताना सार्वत्रिक बंधुत्वाचा विचार समजून घेणे. बहुसांस्कृतिक समाजात सहअस्तित्वाचे नैतिक अधिष्ठान शोधणे. पर्यावरणीय संतुलन व शाश्वत विकासाच्या दृष्टीने मानव-निसर्ग संबंधांचा पुनर्विचार करणे. शिक्षण, धोरणनिर्मिती आणि सामाजिक सुधारणा यांसाठी भारतीय तत्त्वज्ञानातील मूल्यांचा समकालीन वापर शोधणे. म्हणूनच प्रस्तुत अभ्यासात "वसुधैव कुटुंबकम्" या संकल्पनेचा तात्त्विक आशय, ऐतिहासिक संदर्भ आणि आधुनिक सामाजिक-सांस्कृतिक वास्तवातील उपयुक्तता यांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. हा अभ्यास केवळ सैद्धांतिक स्वरूपाचा न राहता समाजातील समरसता, शांतता आणि जागतिक नागरिकत्व (Global Citizenship) या संकल्पनांना बळकटी देणारा ठरेल, अशी अपेक्षा आहे.

## संशोधनाची उदिदष्टे :

वसुधैव कुटुंबकम या संकल्पनेचा तात्त्विक व ऐतिहासिक आधार स्पष्ट करणे

आधुनिक जागतिक समस्यांच्या संदर्भात या संकल्पनेची प्रासंगिकता तपासणे

सामाजिक ऐक्य, सहिष्णुता व मानवतावाद वाढविण्यातील भूमिकेचे मूल्यमापन करणे

शासन, परराष्ट्र धोरण व जागतिक शांतता उपक्रमांमध्ये संकल्पनेचा वापर कसा होतो हे समजून घेणे

शिक्षण व युवा मूल्यसंवर्धनात वसुधैव कुटुंबकमचे योगदान स्पष्ट करणे

## संशोधन पध्दती :

सदर संशोधन हे गुणात्मक स्वरूपाचे असून, त्यामध्ये तत्त्वज्ञानात्मक, ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक दृष्टिकोनांचा वापर करण्यात आलेला आहे. भारतीय तत्त्वज्ञानातील "वसुधैव कुटुंबकम्" या संकल्पनेचा अर्थ, उगम, विकास आणि तिची समकालीन सामाजिक-सांस्कृतिक उपयुक्तता समजून घेण्यासाठी हा दृष्टिकोन उपयुक्त ठरतो. या अभ्यासासाठी मुख्यतः खालील पद्धतींचा अवलंब करण्यात आला आहे: त्यामध्ये दस्तऐवज विश्लेषण प्राचीन ग्रंथ: उपनिषदे, महाभारत (उद्योगपर्व),

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

भगवद्गीता, स्मृतिग्रंथ, आधुनिक ग्रंथ: सामाजिक तत्त्वज्ञान, मानवतावाद, जागतिक नागरिकत्व विषयक पुस्तके, शोधनिबंध, जर्नल लेख, परिषद कार्यवाही, संयुक्त राष्ट्रसंघ इत्यादी संस्थांची अहवालपत्रे इत्यादी तसेच आशय विश्लेषण यामध्ये वसुधैव कुटुंबकम् या संकल्पनेशी निगडित मजकुरातील मुख्य आशय, मूल्ये, विचारसरणी आणि सामाजिक संकेत यांचे तुलनात्मक विश्लेषण करण्यात आले आहे.

## संशोधनाचे स्रोत

प्राथमिक स्रोत यामध्ये संस्कृत मूळ ग्रंथ व त्यांचे प्रमाणित भाषांतर भारतीय तत्त्वज्ञानावरील प्राचीन श्लोक आणि सूत्रे यांचा समावेश करण्यात आला तसेच द्वितीयक स्रोत यामध्ये आधुनिक तत्त्वज्ञ, समाजशास्त्रज्ञ व इतिहासकारांचे ग्रंथ, संशोधन नियतकालिके, ऑनलाइन शैक्षणिक डेटाबेस, वर्तमान सामाजिक-राजकीय घडामोडींवरील विश्लेषणात्मक लेख यांचा समावेश करण्यात आला आहे.

## अभ्यासाची व्याप्ती

हा अभ्यास खालील बाबींवर केंद्रित आहे: वसुधैव कुटुंबकम् या संकल्पनेचा तत्त्वज्ञानात्मक अर्थ, भारतीय सांस्कृतिक परंपरेतील तिचे स्थान, जागतिकीकरण, पर्यावरणीय संकट, सामाजिक संघर्ष, बहुसांस्कृतिकता या पार्श्वभूमीवर तिची प्रासंगिकता, आधुनिक समाजात (शिक्षण, आंतरराष्ट्रीय संबंध, मानवाधिकार) या संकल्पनेचा उपयोग इत्यादी.

## विश्लेषण व अर्थनिर्वचन :

### उदिदष्ट क्र. 1 वसुधैव कुटुंबकम या संकल्पनेचा तात्त्विक व ऐतिहासिक आधार स्पष्ट करणे

"वसुधैव कुटुंबकम्" ही संकल्पना उपनिषद, महाभारत व इतर भारतीय ग्रंथांमध्ये खोलवर रुजलेली आहे. महाउपनिषदातील "अयं निजः परो वेति" या वचनातून संपूर्ण पृथ्वी एक कुटुंब असल्याची उदात्त भावना व्यक्त होते, तर उपनिषदांचे आत्मैक्याचे तत्त्व सर्व मानवांतील मूलभूत ऐक्य अधोरेखित करते. महाभारतातील राजधर्म, अहिंसा, करुणा व लोककल्याणाच्या शिकवणीतून ही संकल्पना व्यावहारिक स्वरूपात दिसते; ऋग्वेदातील "एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति" आणि गीतेतील "समदर्शिनः" या उक्ती समभाव व सहअस्तित्वाचा तात्त्विक आधार देतात. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात, हवामान बदल, महामारी, दहशतवाद व सामाजिक ध्रुवीकरण यांसारख्या सीमारेषा ओलांडणाऱ्या समस्यांच्या पार्श्वभूमीवर "वसुधैव कुटुंबकम्" ही केवळ आध्यात्मिक संकल्पना न राहता नैतिक मार्गदर्शक तत्त्व ठरते. ती विविधता व बहुसांस्कृतिकतेत सामाजिक सलोखा वाढवते, शाश्वत विकासाला प्रेरणा देते आणि स्वार्थाऐवजी सामूहिक हित, संघर्षाऐवजी सहकार्य व शोषणाऐवजी सहजीवनाचा दृष्टिकोन घडवते; म्हणूनच आजच्या संदर्भात तिचे अर्थलक्षण मानवकेंद्री मूल्ये व जागतिक जबाबदारी यांचे संतुलन साधणारे आहे.

### उदिदष्ट क्र. 2 आधुनिक जागतिक समस्यांच्या संदर्भात या संकल्पनेची प्रासंगिकता तपासणे

युद्ध, दहशतवाद, पर्यावरणीय संकट, स्थलांतर, सामाजिक विषमता व सांस्कृतिक संघर्ष या संकल्पनेची आधुनिक जागतिक समस्यांच्या संदर्भात प्रासंगिकता स्पष्टपणे दिसून येते. आजच्या काळात युद्ध व दहशतवादामुळे मानवी सुरक्षितता, शांतता आणि परस्पर विश्वास यांना गंभीर धोका निर्माण झाला आहे; अशा परिस्थितीत ही संकल्पना संवाद, सहअस्तित्व आणि संघर्ष निवारणासाठी मार्गदर्शक ठरू शकते. पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत विकास, जबाबदार उपभोग आणि सामूहिक उत्तरदायित्व यांसारख्या मूल्यांचा आग्रह धरण्यास ती उपयुक्त ठरते. स्थलांतराच्या समस्येत मानवी हक्क, समावेशिता आणि सांस्कृतिक समन्वय यांचा समतोल राखण्यासाठीही तिचे महत्त्व अधोरेखित होते. तसेच सामाजिक विषमता व सांस्कृतिक संघर्षांच्या संदर्भात ही संकल्पना समानता, सामाजिक न्याय आणि विविधतेचा आदर यांना बळकटी देऊन समाजातील तणाव

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

कमी करण्यास मदत करू शकते. त्यामुळे सद्य परिस्थितीत ही संकल्पना केवळ सैद्धांतिक न राहता प्रत्यक्ष समस्यांवर उपाय सुचवणारी, मार्गदर्शक आणि अत्यंत उपयुक्त ठरते.

**उदिदष्ट क्र. 3 सामाजिक ऐक्य, सहिष्णुता व मानवतावाद वाढविण्यातील भूमिकेचे मूल्यमापन करणे**

बहुसांस्कृतिक समाजात सलोखा व सहअस्तित्वासाठी वसुधैव कुटुंबकम मार्गदर्शक ठरू शकते. आजच्या काळात वाढती सामाजिक तणाव, असहिष्णुता, जातीय-धार्मिक ध्रुवीकरण आणि स्पर्धात्मक वैचारिकता या पार्श्वभूमीवर वसुधैव कुटुंबकम ही कल्पना सर्व मानवजातीला एकाच कुटुंबाचा भाग मानून परस्पर आदर, सहानुभूती आणि सहअस्तित्वाची मूल्ये रुजवते. ही संकल्पना विविध संस्कृती, श्रद्धा व जीवनशैली यांचा सन्मान राखत शांततामय सहजीवन, संवाद व समावेशकतेला प्रोत्साहन देते. त्यामुळे जागतिकीकरण, स्थलांतर, सांस्कृतिक संघर्ष आणि सामाजिक विषमता यांच्या संदर्भात सामाजिक ऐक्य, सहिष्णुता व मानवतावाद वृद्धिंगत करण्यासाठी वसुधैव कुटुंबकम ही एक मार्गदर्शक तत्त्वप्रणाली ठरू शकते, असे या उद्दिष्टाचे अर्थस्पष्टीकरण करता येते.

**उदिदष्ट क्र. 4 शासन, परराष्ट्र धोरण व जागतिक शांतता उपक्रमांमध्ये संकल्पनेचा वापर कसा होतो हे समजून घेणे**

सध्याच्या जागतिक संदर्भात “शासन, परराष्ट्र धोरण व जागतिक शांतता उपक्रमांमध्ये संकल्पनेचा वापर” हे उद्दिष्ट भारताच्या G20 अध्यक्षपदाच्या पार्श्वभूमीवर विशेष महत्त्वाचे ठरते. भारताने “वसुधैव कुटुंबकम्” या तत्त्वज्ञानाला केंद्रस्थानी ठेवून समावेशक विकास, हवामान बदल, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा व विकसनशील देशांच्या समस्या यांना जागतिक अजेंड्यावर आणले. सांस्कृतिक कूटनीतीच्या माध्यमातून योग, आयुर्वेद, भारतीय कला, संगीत व अध्यात्मिक परंपरा यांचा प्रसार करून भारताने आपली ‘सॉफ्ट पॉवर’ प्रभावीपणे वापरली, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर विश्वास, सहकार्य व शांततेचा संदेश पोहोचला. या तत्त्वज्ञानामुळे भारताची ओळख केवळ आर्थिक किंवा राजकीय शक्ती म्हणून नव्हे, तर मूल्याधिष्ठित, मानवतावादी व शांतताप्रिय राष्ट्र म्हणून दृढ होत आहे, जे आजच्या ध्रुवीकरण झालेल्या जगात स्थैर्य व संवादासाठी उपयुक्त ठरते.

**उदिदष्ट क्र. 5 शिक्षण व युवा मूल्यसंवर्धनात वसुधैव कुटुंबकमचे योगदान स्पष्ट करणे**

वसुधैव कुटुंबकम ही संकल्पना आजच्या जागतिकीकरण, डिजिटल संपर्क आणि बहुसांस्कृतिक समाजाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत सुसंगत ठरते. शिक्षण व युवा मूल्यसंवर्धनात तिचे योगदान हे विद्यार्थ्यांमध्ये “संपूर्ण जग एक कुटुंब आहे” ही भावना रुजवून जागतिक नागरिकत्व विकसित करण्यात दिसून येते. या तत्त्वावर आधारित शैक्षणिक उपक्रमांमुळे सहिष्णुता, करुणा, सहअस्तित्व, सामाजिक जबाबदारी आणि मानवतावादी दृष्टिकोन यांसारखी नैतिक मूल्ये दृढ होतात. तसेच पर्यावरणीय जाणीव निर्माण करण्यासाठी ही संकल्पना निसर्गालाही कुटुंबाचा भाग मानून शाश्वत विकास, पर्यावरणसंरक्षण आणि संसाधनांचा समतोल वापर याबाबत विद्यार्थ्यांना संवेदनशील बनवते. त्यामुळे वर्तमान काळात वसुधैव कुटुंबकमचा शैक्षणिक उपयोग केवळ नैतिक शिक्षणापुरता मर्यादित न राहता, तो जागतिक शांतता, सामाजिक ऐक्य आणि पर्यावरणीय शाश्वततेसाठी सजग व जबाबदार नागरिक घडविण्याचे प्रभावी साधन ठरतो.

**निष्कर्ष :**

या अभ्यासातून स्पष्ट होते की “वसुधैव कुटुंबकम्” ही संकल्पना केवळ प्राचीन आध्यात्मिक विचार न राहता आधुनिक जागतिक समस्यांवर उपाय सुचवणारी एक सशक्त मूल्यप्रणाली आहे. तिचा तात्त्विक व ऐतिहासिक पाया भारतीय ग्रंथांत दृढ असून

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

आजच्या युद्ध, पर्यावरणीय संकट, सामाजिक विषमता व सांस्कृतिक संघर्षांच्या संदर्भात तिची प्रासंगिकता अधिक वाढली आहे. सामाजिक ऐक्य, सहिष्णुता व मानवतावाद वृद्धिंगत करण्यात ती महत्त्वाची भूमिका बजावते तसेच शासन, परराष्ट्र धोरण व जागतिक शांतता उपक्रमांमध्ये भारताने तिचा प्रभावी वापर केला आहे. शिक्षण व युवा मूल्यसंवर्धनातही ही संकल्पना जागतिक नागरिकत्व, सामाजिक जबाबदारी व पर्यावरणीय जाणीव निर्माण करण्याचे प्रभावी साधन ठरते. म्हणूनच, "वसुधैव कुटुंबकम्" ही संकल्पना आजच्या ध्रुवीकरण झालेल्या जगात मानवकेंद्री मूल्ये व जागतिक जबाबदारी यांचा समतोल साधणारी, शांतता, सहकार्य व शाश्वत विकासासाठी मार्गदर्शक ठरणारी अत्यंत उपयुक्त तत्त्वप्रणाली आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची

महान उपनिषद. वसुधैव कुटुंबकम् — "सम्पूर्ण जग एक परिवार है।"

शर्मा, र. (2022). भारतीय दर्शन और वैश्विक मानवता: वसुधैव कुटुंबकम् का अध्ययन. नई दिल्ली: संस्कृतिवेद विश्वविद्यालय प्रकाशन.

कुमार, अ., एवं वर्मा स. (2023). वसुधैव कुटुंबकम्: सामाजिक तथा सांस्कृतिक प्रासंगिकता. सामाजिक चिंतन पत्रिका, 10(2), 45–60.

महान उपनिषद. वसुधैव कुटुंबकम् — "संपूर्ण जग एक कुटुंब आहे."

जोशी, स. (2021). भारतीय तत्त्वज्ञान व सामाजिक मूल्ये: वसुधैव कुटुंबकम् संदर्भातले विचार. पुणे: विद्यापीठ प्रकाशन.

देशमुख, म., व पाटील, र. (2024). वसुधैव कुटुंबकम् व जागतिक सामाजिक सहजीवन. संशोधन समयपत्रिका, 15(1), 22–38.